प्रशासकीय मान्यता

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे, कर्करोग उपचारांच्या सुविधा निर्माण करण्याकरीता आदिवासी विकास विभागाच्या अनुसूचित जमाती उपयोजनेमधून प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग करण्यासाठी नविन लेखाशीर्ष देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक : सीआरसी-२०१७/८६/प्र.क्र.४४३ (भाग-१)/प्रशा-१

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नविन इमारत, ९ वा मजला,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.

दिनांक: १५ मे, २०१८.

वाचा :-

१. मा.मुख्यमंत्री यांचे सहसचिव, पत्र क्रमांक : सीएमओ/ॲडमिनिस्ट्रेशन/पत्र/इनवर्ड नं. ६३८/२०१७, दिनांक २८.११.२०१७.

२. प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या वरिष्ठ लेखा अधिकारी/ख.वि. यांचे पत्र क्रमांक: ख.वि/चा-१/वैद्यकीय शिक्षण-औषधी द्रव्ये विभाग/यूओआर-१०२/२०१७-१८/८२३, दिनांक २७.१२.२०१७

प्रस्तावना : -

मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील "शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती उपयोजनेमधून कर्करोग उपचाराच्या सुविधा निर्माण करणे" याविषयी दिनांक २७.११.२०१७ रोजी पार पडलेल्या बैठकीबाबत निर्गमित करण्यात आलेल्या इतिवृत्तानुसार आदिवासी विकास विभागाच्या उपयोजनेमधून कर्करोग रुग्णांच्या उपचारार्थ अत्याधुनिक सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर विषयी आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग करण्यासाठी विभागास नवीन लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्याची बाब शासन विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे, कर्करोग उपचारांच्या सुविधा निर्माण करण्याकरीता आदिवासी विकास विभागाच्या अनुसूचित जमाती उपयोजनेमधून प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग करण्यासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टांसह लेखाशीर्ष निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

मागणी क्रमांक/ Demand No.	टी-०६	T-06
मुख्यलेखाशीर्ष/ Major Head	४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च	4210-Capital Outlay on Medical Public Health
उप मुख्यलेखाशीर्ष/ Sub Major Head	०१ - नागरी आरोग्य सेवा	01- Urban Health Services
गौणशीर्ष/ Minor Head	७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना	796- Tribal Area Sub-Scheme
गटशीर्ष/ Group Head	(००)	(00)
उप गटशीर्ष/ Sub Group Head	(००) (०१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे कर्करोग उपचाराच्या अत्याआधुनिक सोयी सुविधा निर्माण करणे.	(00) (01) Providing Modern Cancer Treatment Facilities at Government Medical College and Hospital, Nagpur
संगणक संकेतांक/ CRC Code	४२१० २६०७	4210 2607
उद्दिष्टे/Objects	५२- यंत्र सामुग्री व साधनसामुग्री	52-Machineries and Equipments

३. हा शासन निर्णय, आदिवासी विकास विभागाने, अनौपचारीक संदर्भ क्रमांक ११७, दिनांक २.१२.२०१७ व वित्त विभागाने अनौ.सं.क्र.१४१/अर्थ-१९/१७,दिनांक ०५.१२.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेने तसेच प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या वरिष्ठ लेखा अधिकारी/ख.वि. यांचे पत्र क्रमांक:

ख.वि/चा-१/वैद्यकीय शिक्षण-औषधी द्रव्ये विभाग/यूओआर-१०२/२०१७-१८/८२३, दिनांक २७.१२.२०१७ च्या पत्रान्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५१५१५०९५४२८१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.05.15 15:27:50 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर, महाराष्ट्र.
४. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१३. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१५. वरिष्ठ लेखा अधिकारी, प्रधान लेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर, महाराष्ट्र.
१६. उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-१९/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई
१७. अवर सचिव (प्रशासन-२), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
१९. उप सचिव (शिक्षण/अलेप), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई.
२०. निवडनस्ती (प्रशा-१).